दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : १३२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, मंगळवार, दि.२४ डिसेंबर २०२४


स्वातंत्र्यसैनिक, समाजवादी विचारवंत
साने गुरुजी
यांच्या जयंतीदिनी विनम्र आदरांजली!!

## औषधांची रक्कम अखर्चित राहणे ही बाब योग्य नाही: मुख्यमंत्री

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, अहिल्यानगर :** औषधांच्या संदर्भात रक्कम अखर्चित राहत असेल तर ही योग्य बाब नाही. या अहवालाच्या तपशीलात मी अजून गेलेलो नाही. त्याचा संपूर्ण अभ्यास केल्यावर मी याबाबत बोलेल, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यानगर येथे बोलताना दिली. आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांच्या मुलाच्या लग्नाला अहिल्यानगर येथे मुख्यमंत्री फडणवीस यांनी रविवारी हजेरी लावली. यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री गिरीश महाजन आदी उपस्थित होते. लग्न सोहळ्यानंतर आ. शिवाजी कर्डिले यांच्या निवासस्थानी मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट दिली. हाफकिनने ७१ टक्के औषध पुरवठा न केल्याने राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचा ठपका भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांच्या (कॅग) अहवालात ठेवण्यात आला आहे. आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण औषधी विभागांतर्गत येणार्या संस्थांसाठी हाफकिनला औषध खरेदीची जबाबदारी देण्यात आली होती. मात्र, ‘कॅग’च्या अहवालात हाफकिनने ७१ टक्के औषध पुरवठा केलाच नसल्याचे समोर आले आहे. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत अशा प्रकारे जर औषधांच्या संदर्भात रक्कम अखर्चित राहिली असेल, तर ती योग्य बाब नाही, असे म्हटले आहे. कॅबिनेटमध्ये जी माहिती देण्यात आली, तेवढीच मी ऐकली आहे. त्या अहवालाच्या तपशीलात मी गेलेलो नाही. त्यावर अभ्यास करून मी बोलेल, असेही त्यांनी सांगितले.

## आ.पाटील यांनी माढा मतदार संघातील रस्त्यासंदर्भात घेतली केंद्रीय मंत्री गडकरी यांची भेट

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२३, पंढरपूर :** माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी केंद्रीय रस्ते महामार्ग वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची नागपूर येथे भेट घेऊन मतदार संघातील विविध रस्त्यांच्या कामाबाबत निवेदन देऊन संबंधित कामे मार्गी लावण्याची विनंती केली. यावेळी आमदार पाटील यांनी महाराष्ट्राचा आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठलाची मूर्ती देऊन गडकरी यांचे स्वागत केल. याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलेल्या मागण्यांबाबत सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.



माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी निवडणुकीदरम्यान मतदार संघातील नागरिकांना मतदारसंघातील रस्ते चकाचक करण्याचे आश्वासन दिले होते. मतदार संघातील रस्ते पूर्ण व्हावेत यासाठी त्यांनी केंद्रीय रस्ते महामार्ग वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन माढा मतदारसंघातून जाणारा श्री संत मुक्ताई पालखी महामार्गाला राज्य महामार्ग दर्जा देऊन निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. माढा मतदारसंघातून करमाळा- टेंभुर्णी- पंढरपूर- मंगळवेढा रस्ता चौपदरी करावा. पंढरपूर (तिर्हेमार्ग) देगाव- सुस्ते- टाकळी सिकंदर- कुरुल रस्ता चौपदरी करावा. याचबरोबर मतदारसंघातील अनेक रस्त्यांच्या कामाबाबत निवेदन देऊन लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली आहे. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलेल्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्याने आमदार अभिजीत पाटील यांच्या प्रयत्नांमुळे मतदार संघातील रस्ते चकाचक होणार आहेत.

## लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता कधी मिळणार?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, मुंबई :** राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं. त्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार आणि खातेवाटप देखील जाहीर झालं. यातच विधानसभेचं हिवाळी अधिवेशन देखील पार पडलं.

मात्र, सरकार स्थापन होऊन आज जवळपास १८ दिवस झाले आहेत. तरीही अद्याप लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता महिलांना मिळालेला नाही. त्यामुळे लाडक्या बहिणींना डिसेंबरचा हप्ता कधी मिळणार? याबाबत आता राज्यभरातून प्रश्न विचारले जात आहेत. या पार्श्वभूमीवरच आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना याबाबत मोठं भाष्य केलं आहे.



लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता कधी मिळणार? असा प्रश्न मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्रकार परिषदेत विचारण्यात आला. यावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं की, ‘लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता पुढील सात ते आठ दिवसांत देण्यात येणार आहे.’ दरम्यान, विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीच्या नेत्यांनी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून लाभार्थी महिलांना देण्यात येणाऱ्या १५०० रुपयांच्या हप्त्यात वाढ करून २१०० रुपये करण्यात येतील, अशी घोषणा केली होती.

मात्र, आता सरकार स्थापन होऊन एवढे दिवस झाले तरी लाडक्या बहिणींना डिसेंबरचा हप्ता मिळालेला नाही. यातच डिसेंबरचा हप्ता लाडक्या बहिणींना १५०० रुपये मिळणार की २१०० रुपये मिळणार? हे देखील अद्याप स्पष्ट करण्यात आलेलं नाही. डिसेंबरचा हप्ता कधी मिळणार? आणि नेमकं किती मिळणार? याबाबत ‘लाडक्या बहिणी’मध्येही संभ्रम असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेमध्ये विविध विषयांची माहिती देताना लाडकी बहिण योजनेसंदर्भात महत्त्वाची घोषणा केली. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने अनेक योजना जाहीर केल्या होत्या. या योजनांची पूर्तता करण्यासाठी ३५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्याची माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १ हजार ४०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली होती.

**लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी मिळणार?**

विधानसभा निवडणुकीदरम्यान महायुतीने लाडकी बहीण योजनेची रक्कम १५०० वरून २१०० रुपये करणार असे अश्वासन दिले होते. निवडणुकीनंतर महायुती सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतर २१०० रुपये कधीपासून मिळणार? याची चर्चा सध्या सुरु आहे. मात्र, यासंदर्भात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीत जी आश्वासने दिली आहेत ती सर्व आश्वासने पूर्ण करणार असल्याचं स्पष्ट केलं होतं.

## लोणार ग्रामीण रुग्णालयात अग्नितांडव, रुग्णाचा बेडवरच कोळसा !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, बुलडाणा :** सरोवरनगरी लोणार येथील ग्रामीण रुग्णालयात आज सोमवारी पहाटे अग्नितांडव पाहायला मिळाले. ग्रामीण रुग्णालयातील जनरल वॉर्डमधील एका रुग्णाचा यात जळून कोळसा झाला. सदर मनोरुग्ण हा पैठण येथील रहिवासी होता. त्याचे नाव हरिभाऊ रोकडे, असल्याचे सांगितले जाते. कर्मचाऱ्यांच्या शर्थीच्या प्रयत्नांमुळे ही आग आटोक्यात आल्याने मोठा अनर्थ टळला.

२२ डिसेंबरच्या दुपारी लोणार बसस्थानकावरून अत्यावस्थ अवस्थेतील एका मनोरुग्णाला लोणार येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णवाहिकेद्वारे आणण्यात आले होते. सुरुवातीला त्याने त्याची ओळख सांगितली नाही, मात्र त्याला विश्वासात घेऊन विचारणा केली असता त्याने त्याचे नाव हरिभाऊ रोकडे (रा. पैठण, संभाजीनगर) असल्याचे सांगितले होते. त्याला त्याच्या नातेवाईकांबद्दल विचारणा केली असता, या जगात आपले कुणीही नाही, असे तो सांगत होता. तपासणीनंतर सदर मनोरुग्णावर ग्रामीण रुग्णालयातील जनरल वॉर्डात उपचार सुरू होते.




दरम्यान, रात्री कर्तव्यावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना वॉर्डमधून धूर निघताना दिसला. कर्मचाऱ्यांनी धाव घेतली असता सदर मनोरुग्ण पलगांवर आगीच्या भक्ष्यस्थानी सापडला होता. कर्मचाऱ्यांनी रुग्णालयात उपलब्ध असलेल्या अग्निशामक यंत्राच्या सहाय्याने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत मनोरुग्णाचा जळून कोळसा झाला होता. घटनेची माहिती मिळताच लोणार पोलिसांनी रुग्णालयात धाव घेतली. दरम्यान, ही आग मनोरुग्ण विडी पीत असल्याने लागली, असे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, याची पुष्टी होऊ शकली नाही. ही आग कदाचित शॉर्टसर्किटमुळे लागल्याची शक्यताही नाकारता येत नाही. लोणार पोलीस आणि रुग्णालय व्यवस्थापन सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आगीचे नेमके कारण तपासत असल्याचे वरिष्ठ सूत्रांनी सांगितले. पुढील तपास लोणार पोलीस करीत आहेत.

**थरारक घटनाक्रम !**

रात्रपाळीत कर्तव्यावर असलेले सुरक्षारक्षक उद्धव वाटसर यांना सोमवारी पहाटे ३ वाजून २० मिनिटांदरम्यान एका वॉर्डातून धूर निघत असल्याचे दिसून आले. वाटसर यांनी तत्काळ रुग्णालयातील संबधितांना याबाबत कळविले. अधिपरिचारक विष्णू खरात यांनी शर्थीचे प्रयत्न करीत इतरांच्या मदतीने आग आटोक्यात आणली. दरम्यान, एका बेडला आग लागून त्यावरील रुग्ण आगीत होरपळत असल्याचे त्यांना दिसून आले. आग आटोक्यात येईपर्यंत रुग्णाचा जळून मृत्यू झाला होता.

**अधिपरिचारकाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला**

कर्तव्यावर असलेले अधिपरिचारक विष्णू खरात यांनी सैनिक प्रशिक्षणाचा अनुभव पणाला लावत इतर कर्मचाऱ्यांच्या मदतीने आग विझवण्याचे सहा सिलिंडर वापरून आगीवर नियंत्रण मिळविले. अन्यथा आगीने संपूर्ण रुग्णालय कवेत घेतले असते.

## लोकमान्य टिळक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.२३, दापोली (रत्नागिरी) :** लोकसाधना संचलित लोकमान्य टिळक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, चिखलगावचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार, २१ डिसेंबर २०२४ रोजी रामकृष्ण सभागृहात सायंकाळी सहा वाजल्यापासून रात्री दहापर्यंत मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे कार्यकुशल सचिव कैवल्य दांडेकर यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी संस्थेचे विश्वस्त दिनेश आडविलकर, प्रशासकीय प्रमुख सन्माननीय शैलेश खुळे, शाळेचे मुख्याध्यापक सन्माननीय पांडुरंग ढेरे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक दिनेश नाचणेकर, धनश्री दांडेकर, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांची बहारदार कला सादरीकरणे:**

यंदाच्या स्नेहसंमेलनाचे खास आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी आपल्या नाट्य, नृत्य आणि गाण्याच्या सादरीकरणांतून समाजातील ज्वलंत प्रश्नांवर प्रकाश टाकला आणि भारतीय संस्कृतीच्या महानतेला प्रेक्षकांसमोर उभे केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी उपस्थितांना भारावून टाकले.




**विशेष मान्यवरांची उपस्थिती आणि विद्यार्थ्यांचा सन्मान:**

कार्यक्रमास अण्णासाहेब बळवंतराव (गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती दापोली), लहानगे साहेब (विस्तार अधिकारी, दापोली), राठोड साहेब (विस्तार अधिकारी, उंबर्ले केंद्र), बैकर साहेब (केंद्रप्रमुख, उंबर्ले) यांनी सदिच्छा भेट दिली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करत त्यांनी शाळेच्या प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी आदर्श विद्यार्थी पुरस्कार, सर्वोत्कृष्ट वाचक पुरस्कार आणि सर्वोत्कृष्ट कुलाचा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. पुरस्कार विजेत्या विद्यार्थ्यांनी शाळेविषयी आपल्या भावना व्यक्त करत भावनिक क्षण निर्माण केला.


**पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद:**

विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाला पालक वर्गाने भरभरून प्रतिसाद दिला. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास उंचावला असून त्यांच्या कलागुणांना नवे बळ मिळाले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम गीताने झाली. या स्नेहसंमेलनाने विद्यार्थ्यांमध्ये नवी ऊर्जा निर्माण केली असून शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक वारसा नव्या उंचीवर नेले आहे.

## दिवा- सीएसएमटी लोकलसाठी ढोल बजाव आंदोलन !

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२३, दिवा (ठाणे) :** दिवा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल लोकल सुरू करण्यात यावी यासाठी ढोल बजाव आंदोलन रविवारी २२ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ ते ६ वाजेपर्यंत करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौक येवले चहा ते दिवा स्टेशन येथे हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे आयोजन समाजसेवक अमोल केंद्रे यांनी केले होते. दिवा रेल्वे स्थानकात प्रचंड गर्दीमुळे जीव गमावलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहिली. भविष्यात अशा घटना होऊ नये यासाठी दिवा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्पेशल लोकल चालू करण्यासाठी रेल्वे प्रशासन राज्य सरकार केंद्र सरकार यांचे लक्ष वेधण्यासाठी लक्षवेधी ढोल बजाव आंदोलन करण्यात आले. आंदोलनात रेल्वे प्रशासन, राज्य सरकार व केंद्र सरकाचे लक्ष वेधण्यासाठी लक्षवेधी ढोल वाजवत अनेक फलक हातात घेण्यात आले होते.




लाडक्या बहिणींच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी त्यांचा प्रवास सुखाचा होण्यासाठी दिवा ते सीएसएमटी लोकल चालु करा. माता भगिनी वडीलधारे प्रवाशी बांधव विद्यार्थ्यांचे जीव वाचवण्यासाठी दिवा ते सीएसएमटी लोकल चालू करा. अनेक वर्षा पासून अपघातात मरण पावलेल्या माता भगिनी वडीलधारे प्रवाशी बांधव विद्यार्थी यांना श्रद्धांजली म्हणून तरी तात्काळ दिवा ते उडचढ लोकल चालू करा. माय बाप जनतेसाठी आम्ही भीक मागतो आता तरी तात्काळ दिवा सीएसएमटी लोकल चालू करा. कामावर गेलेल्या आई वडिलांची वाट पाहणाऱ्या चिमुकल्या बाळांच्या साठी तरी तात्काळ दिवा-सीएसएमटी लोकल चालू करा. कोणासाठी नाही पण तुमच्या मतदारांच्या मरण यातना कमी करण्यासाठी तरी तात्काळ दिवा- सीएसएमटी लोकल सुरू करा. असे अनेक फलक आंदोलन करणाऱ्या नागरिकांच्या हातात होते. सदर आंदोलनात असणाऱ्या फलकांची चर्चा सर्वत्र सुरू आहे. आंदोलनाच्या शेवटी समाजसेवक अमोल केंद्रे यांनी सांगितले की, ही लढाई राजकीय नाही.लोकल चालू झाली तर अनेकांचे जीव वाचतील, दिवा शहरातील नागरिकांचा, माता, भगिनी, वडीलधारे, प्रवाशी बांधवांचे, विद्यार्थ्यांचे, जीव वाचतील. त्यामुळे यावर केंद्र सरकार आणि राज्य सरकार यावर मार्ग काढून तात्काळ नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच दिवा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्पेशल लोकल चालू करतील अशी आशा आहे.

सदर आंदोलनात सहभागी झालेल्या माता भगिनी वडीलधारे प्रवाशी बांधवांचे विद्यार्थ्यांचे पोलिस प्रशासनाचे पत्रकार बांधवांचे समाजसेवक अमोल केंद्रे यांनी मनपूर्वक आभार मानले.

## संपादकीय



### साने गुरुजी

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची जयंती. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कादंबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्रभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले.

साने गुरुजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन

# श्यामची आई आणि सुसंस्कारी श्याम

साने गुरुजी हे मराठीतले एक श्रेष्ठ गांधीवादी शिक्षक, स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक आणि प्रतिभावंत लेखक होते. त्यांचा जन्म कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड या गावी झाला. त्याठिकाणी त्यांचे वडील कोर्टाचे काम करीत असत. कोर्टाचे घराणे साधारणतः वैभवसंपन्न व श्रीमंत समजले जाते व त्यांच्या आजोबांच्या वेळची परिस्थिती तशी होतीही. पण त्यांच्या वडिलांच्या, सदाशिवरावांच्या वेळेपासून मात्र घराण्याची आर्थिक स्थिती घसरत गेली. ती इतकी की, सदाशिवरावांचे घरदारही जप्तीत नाहीसे झाले. अशा रितीने बडा घर पण पोकळ वासा झालेल्या या घराण्यात दि.२४ डिसेंबर १८९९ रोजी पांडुरंग सदाशिव सानेंचा जन्म झाला. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा फार मोठा प्रभाव पडला होता. त्यांच्या आईने त्यांच्या बालमनावर जे विविध संस्कार केले त्यातूनच साने गुरुजींचा जीवनविकास झाला. त्यानी इंग्रजी साहित्यामध्ये एमए. ही उच्च पदवी मिळवली होती.


**जो आवडतो सर्वांला।**
**तोचि आवडे देवाला।।**

शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील प्रताप हायस्कूल येथे शिक्षक म्हणून सहा वर्षे- सन १९२४ ते १९३०पर्यंत नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वतःच्या उदाहरणातून स्वावलंबनाचे धडे दिले, सेवावृत्ती शिकवली. अंमळनेर येथील प्रताप तत्त्वज्ञान केंद्र येथे त्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यासही केला. इ.स. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत असत. इ.स.१९३० साली त्यांनी शिक्षकाची नोकरी सोडून सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. त्यांनी काँग्रेस नावाचे साप्ताहिक काढले. दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी व्हावी म्हणून प्रयत्न केले. जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथील काँग्रेस अधिवेशन-१९३६ यशस्वी होण्यासाठी त्यांनी खूप काम केले. इ.स.१९४२च्या चळवळीत भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार केला. फैजपूर येथील अधिवेशनात महात्मा गांधींच्या विचारसरणीस अनुसरून त्यांनी मैला वाहणे व ग्राम स्वच्छतेची इतर कामे केली.

साने गुरुजी यांनी राष्ट्र सेवा दलाची स्थापना केली. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहातून त्यांच्या देशभक्तिपर कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यातील बलसागर भारत होवो सारख्या कवितांचा नागरिकांवरील वाढता प्रभाव लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने त्या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त केल्या होत्या. त्यातील ही एक कविता-

**बलसागर भारत होवो।**
**विश्वात शोभुनी राहो।।**
**हे कंकण करी बांधियले।**
**जन सेवेत जीवन दिधले।।**
**राष्ट्रार्थ प्राण हे उरले।**
**मी सिद्ध मरायाला हो।।**

समाजातील जातिभेद, अस्पृश्यता यांसारख्या अनिष्ट रूढी व परंपरांना साने गुरुजींनी नेहमी विरोध केला. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा, यासाठी त्यांनी सन १९४६च्या दरम्यान महाराष्ट्राचा दौरा केला, या भूमिकेला त्यांनी महात्मा गांधींचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला, तो शेवटपर्यंत मिळाला नाही. अखेर साने गुरुजींनी या मुद्यावर उपोषणाचा मार्ग अवलंबला व त्यांना यश मिळाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला खऱ्या अर्थाने मुक्त केले, असे त्या वेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या मार्गाने त्यांनी भारत जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यांतील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून



- संकलन व सुलेखन -
कृष्णकुमार निकोडे गुरूजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.

घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असे या चळवळीत अभिप्रेत होते. ते स्वतः तमिळ, बंगाली आदी भाषा शिकले होते. सन १९४८मध्ये त्यांनी साधना साप्ताहिक सुरू केले. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, लेख, निबंध, चरित्रे, कविता यांमधून त्यांच्यातील संवेदनशील साहित्यिकही आपल्याला दिसतो. मानवतावाद, सामाजिक सुधारणा व देशभक्ती ही मूल्ये त्यांच्या साहित्यात ठायी ठायी दिसतात. त्यांनी एकूण ७३ पुस्तके लिहिली. त्यांनी त्यांचे बहुतांश लेखन हे तुरुंगात असतानाच केले. श्यामची आई ही सुप्रसिद्ध कादंबरी त्यांनी नाशिकमधील तुरुंगात असतानाच लिहिली. आचार्य विनोबा भावे रचितट गीता प्रवचनेसुद्धा विनोबा भावे यांनी धुळे येथील तुरुंगात-१९३२ साली सांगितली व साने गुरुजींनी लिहिली. याच धुळ्यातील तुरुंगात त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील सहभागाबद्दल सुमारे १५ महिन्यांचा तुरुंगवास भोगला. तसेच पुढे बंगलोर येथील तुरुंगात असताना त्यांनी तिरुवल्लिवर नावाच्या कवीच्या कुरल नावाच्या तमिळ महाकाव्याचे मराठीत भाषांतर केले. नंतर फ्रेंच भाषेतील लेस मिझरेबल्स या कादंबरीचे दुःखी या नावाने मराठीत अनुवादन केले. डॉ.हेन्री थॉमस या जगप्रसिद्ध मानववंश शास्त्रज्ञाच्या दी स्टोरी ऑफ ह्युमन या पुस्तकाचे मराठीत मानवजातीचा इतिहास असे भाषांतर केले.

**करील मनोरंजन जो मुलांचे।**
**जडेल नाते प्रभुशी तयाचे।।**

हे गुरुजींच्या जीवनाचे सार होते. मनोरंजनातून मुलांवर सुसंस्कार करण्यासाठी गुरुजींनी अनेक पुस्तके लिहिली. साने गुरुजींचे भारतीय संस्कृती आणि हिंदू धमविर निरतिशय प्रेम होते. त्यानी भारतीय संस्कृती हा ग्रंथ लिहिला. तसेच भारतीय संस्कृतीतील अनेक महापुरुषांची चरित्रे लिहिली. त्यांचे मोरी गाय हे पुस्तक प्रसिद्ध आहे. मातृहृदयी गुरुजींनी आई वडिलांच्या प्रेमावर मोलकरीण नावाची अप्रतिम कादंबरी लिहिली ज्यावर पुढे जाऊन मराठी चित्रपट निघाला. गुरुजींनी लिहिलेली ही कविता खरा धर्म शिकविते-

**खरा तो एकचि धर्म,**
**जगाला प्रेम अर्पावे।।**
**जगी जे हीन अतिपतित,**
**जगी जे दीन पददलित।।**
**तया जाऊन उठवावे,**
**जगाला प्रेम अर्पावे।।**

ही कविता भारतीय संस्कृतीची द्योतक आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात साने गुरूजी भारतीय समाजातील असमानता दूर करण्याच्या शक्यतेमुळे निराश झाले होते. महात्मा गांधींच्या हत्येचा त्यांच्यावर खोलवर परिणाम झाला. या शोकांतिकेबद्दल त्यांनी दिलेला प्रतिसाद २१ दिवस उपोषणासाठी होता. साने गुरुजी अनेक कारणांमुळे देशाच्या स्वातंत्र्यानंतर खूप अस्वस्थ झाले. दि.११ जून १९५० रोजी झोपेच्या गोळ्यांचा अतिरेक घेत त्यांनी आत्महत्या केली व जीवनयात्रा संपवली.

**अशी पाखरे येती, स्मृती ठेवुनीया जाती।**
**दोन दिसांची रंगतसंगत, दोन दिसांची नाती।।**
**!! साने गुरूजींना सप्ताहभर जयंतीच्या पावन पर्वावर अनंत कोटी विनम्र अभिवादन !!**

## सर्व संमत..

सत्तेमध्ये हवाचं मी
मत असे सर्व संमत
नावमाझे आले पुढे
हीचं तर खरी गंमत

मीचं सोडवेन कोडी
होतात सारे सहमत
मीचं पळवेन घोडी
पक्के होते एकमत

समोर ये अस्मादिक
गर्कन फिरे जन मत
अशीजादू भाषणात
वळते बाजूने बहुमत

संकटमोचक बोलता
लढवे खास हिकमत
जन मानसा वरती ते
नीत गाजवी हुकूमत

आठवण माझी येते
जर गणित ना जमत
आपले भाग्यकसे ते
नशीब राहे आजमत

सत्तेला माझ्यावाचून
कसे हो नसे करमत
जय माळा पडे गळा
ही खरोखरी करामत

अन्य ना काही महत्व
सेवाभाव ही अनामत
उगाचं नाही मोठेपणा
कुणी कुणा ना मानत

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# बनावट औषधांवर सरकारचे नियंत्रण का नाही ?

अन्न आणि औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी भिवंडीमधील नारपोली येथील मे. ऍक्टिव्हेन्टिस प्रायव्हेट लिमिटेड या बनावट औषधांची विक्री करणाऱ्या कंपनीतून एक कोटी ८५ लाख रुपयांच्या बनावट औषधांचा साठा नुकताच जप्त केला. मे. ऍक्टिव्हेन्टिस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीतून ऑगस्ट २०२४ मध्ये सुमारे ५२ लाख ६० हजार किमतीची बनावट औषधे जप्त करण्यात आली होती. या औषधांवर केरळ, उत्तराखंड, मेल्लोर,गढवाल या ठिकाणी ही औषधे बनवली असल्याचे पत्ते होते.

या कंपन्यांतून पुन्हा औषधे मागवली गेल्याची माहिति मिळताच औषध प्रशासनाने या औषधांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले ज्यांचा अहवाल आल्यावर प्रतिजैविक औषधांमध्ये आवश्यक असलेली घटकद्रव्ये अस्तित्वातच नसल्याचे समोर आले. याचवेळी ही औषधे विकणाऱ्या मीरारोड येथील मेसर्स केभी जेनेरिक हाऊसवर धाड टाकून सुमारे ९६ लाख किमतीची बनावट औषधे जप्त करण्यात आली आणि या गोदामाला सील करण्यात आले. गेल्या काही महिन्यांपासून बनावट औषधांप्रकरणी आठ गुन्हे दाखल झाले आहेत. या बनावट औषधांची सरकारी रुग्णालयांमध्येही विक्री झाल्याचे उघड झाले आहे. जंतुसंसर्ग झालेल्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी सरकारकडून ४ लाख ॲन्टिबायोटिक खरेदी करण्यात आल्या. जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांना या टॅबलेटचे वितरणही करण्यात आले. यातील ३ लाख ७८ हजार ४०० टॅबलेटचे सेवनही रुग्णांनी केले. या औषधाने रुग्णांवर उपचार झाल्यानंतर वर्षभरानंतर ही औषधच बोगस असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे, ज्यामुळे राज्यातील राजकीय वातावरणही सध्या तापले आहे.

सीलबंद खाद्य उत्पादनातील रसायनांचा वापर, शेतमालावर होणारी रासायनिक फवारणी,



फळे आणि भाज्या लवकर पिकवण्यासाठी त्यांच्यावर केली जाणारी रासायनिक प्रक्रिया, वाढते प्रदूषण, हवामानातील अनियमितता या सर्वांमुळे सामान्य माणसाचे जीवनमान धोक्यात आले आहे.

२०-२५ वर्षांपूर्वी जे आजार आणि रोग केवळ श्रीमंतांच्या घरात पाहायला मिळत ते आता सामान्य माणसांनाही जडू लागले आहेत. रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, हांडांचे विकार आता घरोघरी होऊ लागले आहेत, परिणामी या सर्वांवर प्रतिदिन औषधे खाणाऱ्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. या आजारांवरील औषधांची मागणी वाढल्याने गेल्या काही वर्षांत बनावट औषधे बनवणाऱ्या कंपन्या आणि ही औषधे ग्राहकांपर्यंत पोहोचवणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्या आहेत. सध्याच्या प्रमाणित कंपन्यांच्या नावांची आणि औषधांच्या वेष्टनांची हुबेहूब नक्कल करून बनावट औषधे बाजारात विकली जात आहेत. राज्यातील नागरिकांना रोजगार मिळावा म्हणून उत्तरेतील राज्यांनी औषध उत्पादकांना अधिक सवलती दिल्या परिणामी हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, मिझोराम आदी राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात औषध कारखाने उभे राहिले आहेत. या कारखान्यांवर राज्यांच्या अन्न आणि औषध प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण नाही त्यामुळे बनावट औषधांच्या निर्मितीला मोकळे रान मिळाले आहे. अन्य राज्यांतील घाऊक आणि किरकोळ विक्रेते ही औषधे मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. त्यामुळे बनावट औषधांचे जाळे महाराष्ट्रासह अन्य राज्यांतही पसरले आहे.

सवलतीच्या दरात ऑनलाईन औषध पुरवणाऱ्या कंपन्यांकडूनही बनावट औषधे पुरवली जात असल्याचे लक्षात आल्यावर मध्यंतरी ऑनलाईन संकेतस्थळांवरही कारवाई करण्यात आली होती. बनावट औषधांच्या सुळसुळाटामुळे औषधे खरेदी करताना सावधानता बाळगण्याचे आवाहन राज्याच्या अन्न आणि औषध प्रशासनाने नागरिकांना केले आहे; मात्र बनावट औषधे ओळखायची कशी याबाबत कोणत्याही सूचना प्रशासनाकडून नागरिकांना देण्यात आलेल्या नाहीत. आजारातून बरे होण्यासाठी रुग्ण विश्वास ठेऊन औषधे घेत असतो; मात्र ही औषधे बनावट असल्यास त्याच्या जीवाचे बरे वाईट करू शकतात याची तिळमात्र जाण त्याला नसते. सध्यस्थीतीला मनवाची हाव एव्हढी वाढली आहे कि इतरांचा जीव गेला तरी चालेल पण माझा लाभ झाला पाहिजे. ही राक्षसी प्रवृत्ती असून बनावट औषधे बनवणारे उद्योजक आणि ही औषधे रुग्णांना विकून गडगंज नफा कमावणाऱ्या टोळ्या याच प्रवृत्तीत मोडतात. अन्य क्षेत्रात होणारा भ्रष्टाचार केवळ त्या क्षेत्रातील नागरिकांवर प्रभाव करतो; मात्र औषध निर्मितीतील भ्रष्टाचार हा प्रत्येक सामान्य माणसाच्या जीवितावर गंभीर परिणाम करू शकतो. बनावट औषधांची होत असलेली विक्री हा काही नवीन मुद्दा नसून गेल्या काही वर्षांपासून या संदर्भातील वृत्ते सातत्याने कुठेनाकुठे वाचनात येत आहेत. या विषयांवर चित्रपटांची निर्मितीही करण्यात आली आहे. सामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या बाबीसंदर्भात सरकार आजतागायत एव्हढे निष्क्रिय कसे काय असू शकते असा प्रश्न आता प्रत्येकालाच पडला आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## म्हाते खुर्द गावच्या दोन गायींचा बिबट्याने घेतला बळी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, मेढा (जावली) :** म्हाते खुर्द गावचे रहिवासी सुभाष हरीभाऊ दळवी यांच्या दोन गायींचा रविवार, दि.२२ डिसेंबर २०२४ रोजी बिबट्याने बळी घेतल्याची भीषण आणि दुर्दैवी घटना म्हाते खुर्द गावच्या डोंगर भागात घडली. प्रत्यक्ष घटनास्थळी मृत गायींची पाहणी दरम्यान अत्यंत हृदयद्रावक परिस्थिती या ठिकाणी पाहायला मिळाली. बिबट्याने या गायींवर हल्ला करून इतरत्र फरपटत नेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत आहे. या ठिकाणच्या आजुबाजूला मृत गायीचे अवशेष आढळून आले आहेत. म्हाते खुर्द गावातील रामचंद्र आनंदा दळवी यांची शेळीही काही दिवसांपूर्वीच वन्य प्राण्यांच्या हल्यात मृत्युमुखी पडली आहे. त्यामुळे म्हाते खुर्द गावच्या परिसरात बिबट्यांचे हल्ले करण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढतच आहेत. आतापर्यंत जावली तालुक्यातील ब-याच पाळीव जनावरांचा त्यांनी फडशा पाडला असण्याची शक्यता आहे. म्हाते खुर्द गावच्या वनक्षेत्रात तसेच शिवारात बिनदिक्कतपणे बिबट्या वावरत आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा म्हाते खुर्द व कै.आण्णासाहेब पाटील माध्यमिक विद्यालय म्हाते बुद्रुक या शाळांमध्ये म्हाते खुर्द मुरा या ठिकाणचे शालेय विद्यार्थी याच डोंगर भागातून दररोज ज्ञानार्जनासाठी ये-जा करीत आहेत. त्यामुळे या लहान शाळकरी मुलांमध्ये, त्यांच्या पालकांमध्ये तसेच म्हाते खुर्द ग्रामस्थांमध्ये या घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वी मानवी वस्तीमध्ये बिबट्या एका महिलेला दिसला असल्याची ग्रामस्थांमध्ये चर्चा आहे. भविष्यात मानवी वस्तीसह, शेतात जाणारी माणसे, घरी बांधलेली पाळीव जनावरे यांना बिबट्याने लक्ष्य करू नये. म्हणून म्हाते खुर्द परिसरात वनविभागाने पिंजरा लावण्यात यावा. अशी मागणी म्हाते खुर्द ग्रामस्थ व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी केली आहे.

## खते लिंकींगची सक्ती केल्यास कारवाई होणार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, अहिल्यानगर :** रासायनिक खत कंपन्यांकडून आवश्यक खतासोबत इतर अनावश्यक खते, औषधे लिंकींगची सक्ती केली जात असल्याने खत दुकानदार, शेतकर्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. दरम्यान, लिंकींगची सक्ती करणार्या कंपन्या, घाऊक व किरकोळ विक्रेत्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. संबंधित कंपनी संदर्भात ठोस पुरावे आढळल्यास कारवाई बाबत प्रस्ताव आयुक्तांकडे पाठविला जाईल, असा इशारा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी दिला आहे. सध्या रब्बी हंगाम चालू असल्यामुळे खताची मागणी प्रचंड वाढली आहे. मात्र खत कंपन्या खतांसोबत लिंकींगची सक्ती करत आहेत. शेतकर्यांना आवश्यक असलेल्या खतांसोबत इतर अनावश्यक खते, औषधे दिली जात आहे. सदर खते, औषधांची आवश्यकता नसतानाही खत दुकानदारांना खरेदी करण्याची सक्ती कंपन्याकडून केली जात आहे. एखाद्या खत विक्रेत्याने अनावश्यक खते, औषधे घेण्यास नकार दिल्यास संबंधित दुकानदारास आवश्यक तो खतपुरवठा केला जात नाही. जाणीवपूर्वक त्यांची अडवणूक केली जाते. त्यामुळे त्यांना ते घ्यावे लागते.

खत दुकानदार ते खते, औषधे शेतकर्यांच्या माथी मारतात. याचा आर्थिक भुर्दंड शेतकर्यांना सहन करावा लागत आहे. खत कंपन्यांकडून होत असलेल्या लिंकींग सक्तीला आळा घालण्यासाठी खत पुरवठादार असोसिएशनच्या यापूर्वी जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठका झाल्या आहेत. केंद्र सरकारने संबंधीत कंपन्यांना पत्रव्यवहार करून लिंकींग न करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र तरीही त्यांच्याकडून लिंकींग केले जात आहे. असा प्रकार अहिल्यानगर जिल्ह्यात सर्रास सुरू असून याला खत दुकानदारांसह शेतकरी वैतागले आहेत. दरम्यान, यासंदर्भात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बोराळे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, कंपन्यांकडून अनावश्यक खते, औषधांची सक्ती केली जात असेल व तसे पुरावे हाती आले तर संबंधित कंपनीविरोधात कारवाई करण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्यामार्फत आयुक्तांकडे प्रस्ताव पाठवू, प्रस्ताव गेल्यानंतर संबंधित कंपनीवर कारवाई होईल. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील घाऊक व्यापारी, किरकोळ विक्रेते यांच्याकडून लिंकींगची सक्ती होत असेल आणि तशा तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल असेही ते म्हणाले.

## पारनेर तालुका पास्टर फेलोशिपचे अध्यक्ष पा.सुनील सूर्यवंशी यांचे दुःखद निधन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील हंगा येथील रहिवासी पास्टर सुनील सूर्यवंशी यांचे रविवार, दि. २२ डिसेंबर रोजी रात्री १ वाजता हृदयाच्या तीव्र झटक्याने निधन झाले. आज रोजी त्यांचे वय ५२ होते. पास्टर सुनील सूर्यवंशी हे पारनेर तालुका पास्टर असोसिएशनचे अध्यक्ष होते. अध्यक्ष पदावर असताना अन्याय होण्याऱ्या व्यक्तीवर त्यांनी न्याय देण्याचे काम केले. पास्टर सुनील सूर्यवंशी यांचे चर्च हंगा इथे भरत असत. अतिशय विनम्र भावाने त्यांनी येशू ख्रिस्ताची सेवा केली.अनेक लोकांना त्यांनी येशू ख्रिस्तांच्या शांतीचा मार्ग दाखवला. सेवा करत असताना पारनेर तालुक्यासह त्यांनी संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात आपल्या सेवेतून अनेक लोक जोडली. त्यांच्या जाण्याने संपूर्ण हंगा चर्च मंडळी, तसेच घरातील परिवार, नातेवाईक मित्र यांना दुःख झाले आहे.त्यांच्या पाश्चात त्यांचे भाऊ गंगारम सूर्यवंशी, अनिल सूर्यवंशी, विलास सूर्यवंशी, अशोक सूर्यवंशी, बहीण मीना सूर्यवंशी,बहीण जयश्री वाझ,मेहुणे पास्टर जेसन वाझ,भाचे जोएल वाझ,भाची जेसीका वाझ या परिवारातील सदस्यांना अतिशय दुःख झाले आहे.अशा या विनम्र व देवाचे अभिषेक्त सेवक पास्टर सुनील सूर्यवंशी यांना भावपूर्ण श्रद्धांजली. तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ यांच्याकडून भावपूर्ण आदरांजली.

# मुक्रमाबाद शहराला तालुक्याचा दर्जा देण्याच्या मागणीसाठी नागरिकांनी कसली कंबर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, मुखेड (नांदेड) :** निजामकालीन तालुका असलेल्या व तालुका निर्मिती च्या उंबरठ्यावर असलेल्या मुक्रमाबाद शहराला तालुक्याचा दर्जा देण्यात यावा. अशी मागणी सद्या जोर धरू लागली असून उदगीर जिल्हा निर्मिती च्या बातम्या सध्या समाज माध्यमात फिरत असल्याने पुन्हा एकदा मुक्रमाबाद शहराला तालुक्याचा दर्जा देण्यात यावा. अशी मागणी परिसरातील नागरिकांतून करण्यात येऊ लागली आहे.

मुख्यमंत्री पदावर पुनश्च एकदा देवेंद्र फडणवीस विराजमान झाल्याने उदगीर जिल्हा निर्मितीच्या व म क्रमाबाद शहराला तालुक्याचा दर्जा देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

यापूर्वी प्रशासनाकडे अनेकदा मुक्रमाबाद शहराला तालुका करण्यात यावा यासाठी निवेदनाद्वारे व रास्ता रोको सही करण्कयाची मोहीम राबहुन मागणी करण्यात आली होती.मुखेड तालुक्यातील सर्वात मोठी १७ सदस्यीय ग्राम पंचायत असल्याने मुक्रमाबाद शहराची लोकसंख्या २० हजाराच्यावर असुन निजामकालीन तालुका असलेले हे शहर महाराष्ट्र शासनाच्या तालुका निर्मितीत अग्रेसर स्थानावर आहे शिवाय या शहरात तालुका निर्मितीसाठी लागणाऱ्या सर्व सेवा सुविधा व शासकीय कार्यालयासाठी लागणारी शासकीय जागा गायरान जागेच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात ऊपलब्ध आहे. मुक्रमाबाद पासुन तालुक्याचे अंतर ५० कि.मी. हुन अधिक असल्याने शासकीय तर जिल्ह्याचे अंतर ११० -१२० कि.मी.आहे.नागरीकांना शासकीय व निमशासकिय कामासाठी जनतेला नाहक वेळेचा व पैशाचा त्रास सहन करावा लागत असुन एका फेरीत काम झाले नाही तर परत दुसऱ्या दिवशी तालुका गाठावा लागतो त्यामुळे जनतेला ईच्छा नसतानाही आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.

परिसरातील लोकांसाठी ऊपयुक्त असलेली भव्य व्यापारपेठ व राष्ट्रीयकृत बँक, महाराष्ट्र ग्रामिण बँक व ईतर खाजगी बँका, निजाम काळापासून पोस्ट ऑफिस येथे ऊपलब्ध आहे. दर शुक्रवारी आठवडी बाजाराच्या दिवशी मुखेडचे दुय्यम निबंधक अधिकारी मुक्रमाबादेत येऊन रजिस्टर (बयनामा) केला जातो. ६० ते ७० गाव वाडी तांड्यांचा सतत संपर्क मुक्रमाबाद शहराशी असतो. दळणवळणासाठी मुक्रमाबाद शहर अत्यंत ऊपयुक्त असुन शैक्षणिक दृष्ट्या परीपुर्ण असलेल्या या शहरात केंद्रीय प्रा.कन्या शाळा, जि.प.हायस्कुल, दोन ज्युनिअर कॉलेज, एक सिनिअर कॉलेज, डि. एड. व बि.एड कालेजेस, जी.एन.एम व ए.एन.एम. कॉलेज आहेत. मुक्रमाबाद येथील पोलीस स्टेशन येथे एक सहाय्यक पोलीस निरीक्षक व दोन पोलीस उपनिरीक्षकाची नेमणूक असून मोठा पोलीस कर्मचारी तैनात आहेत. या पोलीस स्टेशन अंतर्गत ६१ ग्राम पंचायतीसह ११७ गाव व वाडी तांड्यांचा समावेश आहे. तसेच नव्यानेच प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यात आल्यामुळे मुक्रमाबाद सह परिसरातील रूग्णांसाठी चांगली रुग्णसेवा सुरू झाली आहे.

त्यामुळे निजामकालीन तालुका असलेल्या व तालुका निर्मितीच्या उंभरट्यावर असलेल्या मुक्रमाबाद शहराला नव्याने निर्मिती करण्यात येणाऱ्या तालुका निर्मितीत स्थान देण्यात यावे अशी कण्यात येत आहे. मुख्यमंत्री पदावर पुनश्च एकदा देवेंद्र फडणवीस विराजमान झाल्याने उदगीर जिल्हा निर्मितीच्या व मुक्रमाबाद शहराला तालुक्याचा दर्जा देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

मुक्रामाबाद शहर हे पूर्वी निजामाच्या काळात तालुका होते. त्यामुळे या शहराला तालुका निर्मितीत तालुक्याच्या दर्जा देऊन आम्हाला निजामकालीन असलेल्या तालुका परत एकदा तालुका करून द्यावा असे येथील नागरिकांनी सांगितले.

# तुंगतच्या युवकाच्या आमरण उपोषणकडे प्रशासनाचे दुर्लक्ष; पोषणाचा ८ वा दिवस

## उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात नेण्याचा झाला प्रयत्न




**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२४, पंढरपूर :** शासनाच्या विना तारण व्यवसायिक कर्ज योजनेतून व्यवसाय करण्यासाठीतुंगतयेथील उद्योजकयुवकाने कर्जाची उचल करण्यासाठी सर्व प्रक्रिया पूर्ण केली. मात्र या लाभार्थ्यास कर्जाचा पुरवठा करण्यात आला नाही. आयडीबीआय बँक प्रशासनाचे दुर्लक्षित कारभाराविरोधात तुंगत येथील युवकाने संवैधानिक मार्गाने सुरू केलेल्या उपोषणाचा ८ वा दिवसअसून यासंदर्भात अद्यापतरी प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची दखल घेतली नसल्याने संताप व्यक्त होत आहे. दोन दिवसांपूर्वी पोलीस प्रशासनाने सदर युवकास उपचारासाठी पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयात नेले असता त्याच ठिकाणी रुग्णालयाबाहेर उपोषण सुरू ठेवले होते. उपोषण कर्ते युवकाने रात्रभर बाहेर मैदानात उपोषण सुरू ठेवले होते.

शासनाच्या विना तारण व्यवसायिक कर्ज योजनेतून व्यवसाय करण्यासाठी तुंगत येथील सचिन रणदिवे या युवकाने आयडीबीआय बँक आणि जिल्हा आग्रणी बुन्केकडे पाठपुरावा केला. यापूर्वी त्यांनी उपोषण केल्यानंतर बँक व्यवस्थापनाकडून त्यांना कागदपत्रांचे नियम अटी शर्थिवर प्रकरण मंजुर करण्याचे आश्वासन देऊन उपोषण सोडविले होते. यानंतर कागदपत्रे पूर्तता करून ही सदर युवकाचे कर्ज प्रकरण नामंजूर केल्याने दिनांक १६ डिसेंबर पासून पुन्हा युवकावर तुंगत गणेश मंदिर सभागृहात दुसऱ्यांदा उपोषण करण्याची वेळ आली आहे. उद्योजकयुवकांना कर्ज देताना पंढरपूर तालुक्यातील बँकांकडून टाळाटाळ केली जात आहे. सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन ही तुंगत याठिकाणच्या उद्योजक तरुण सचिन रणदिवे यास कर्ज देताना अपमानास्पद वागणूक देत त्यास कर्ज देण्यास टाळाटाळ केल्याने बँकांचे मनमानी कारभाराविरोधात रणदिवे हे दिनांक १६ डिसेंबर पासुन दुसऱ्यांदा आमरण उपोषणास बसले आहेत.तुंगतगाव आणि परिसरातील ३०० महिला १०० पुरुषांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने रणदिवे यांनी लक्ष्मी फुड्स या नावे उद्योग उभारणी केली असुन सदर उद्योगासाठी स्टार्ट अप योजनेअंतर्गत कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी बॅन्केकडे पाठपुरावा केला.

सर्व कागदपत्रांची पुर्तता करुनही शेवटी बँक कर्मचारी आणि अधिकारी यांनी कर्ज देण्यास टाळाटाळ केल्याने संबंधित अधिकार्यांची चौकशी होऊन त्यांचेवर कारवाई करण्यात यावी. यासाठी त्यांनीउपोषणाचा मार्ग अवलंबिला असुन यावेळी ग्रामपंचायत सदस्य नवनाथ रणदिवे, नारायण (बापु) रणदिवे, सुधीर आंध, माजी ग्रामपंचायत सदस्य औदुंबर गायकवाड, वामन वनसाळे, राजु भोसले, श्रीकृष्ण पवार, विश्वनाथ गायकवाड, यांचेसह तुंगत ग्रामस्थांनी उपोषणस्थळी भेट देत पाठिंबा दर्शविला असुन आयडीबीआय बँक पंढरपूर शाखेस तुंगत गावचे पालकत्व असून पिक कर्जासह इतर महामंडळ कर्ज देताना दुजाभावाची वागणूक दिली जात असल्याने संताप व्यक्त केला आहे.

**उपोषण कर्ता युवक जाणार जरांगे- पाटलांच्या भेटीला**

तुंगत याठिकाणी उपोषण करीत असलेल्या सचिन रणदिवे यांची बँक व्यवस्थापनाचे दुर्लक्षित कारभाराविरोधात आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबिला असला तरी ८ दिवसापासुन यासंदर्भात प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याने अखेर सदर युवक सोमवारी दुपारी उपोषण गाडीमध्ये सुरुच ठेवून मराठा आरक्षणासाठी लढा देत असलेले संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांचे भेटीसाठी गेले असुन जोपर्यंत आपणास न्याय मिळत नाही. तोपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्णय रणदिवे यांनी घेतला आहे.

# थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क अलर्ट

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, अहिल्यानगर :** थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर विविध ठिकाणी दारू आणि मटण पार्ट्यांचे बेत आखले जात आहेत. काही ठिकाणी रंगीत-संगीत पार्ट्या ही आयोजित केल्या आहेत. अशा परिस्थितीत बेकायदेशीर बनावट दारूचा वापर होण्याची शक्यता ओळखून येथील राज्य उत्पादन शुक्ल विभाग अलर्ट झाला आहे. अधीक्षक प्रमोद सोनोने, उपअधीक्षक प्रवीणकुम ार तेली यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईसाठी ८ पथके स्थापन केली आहेत. त्यांच्याकडून कारवाई करण्यात येत आहे. रात्रीची गस्त सुरू करण्यात आली आहे. जुन्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी थर्टी फर्स्ट (३१ डिसेंबर) रोजी प्रत्येक जण आपआपल्या पध्दतीने पार्ट्यांचे आयोजन करत असतो. खास करून तरूणांकडून मोठ्या प्रमाणात पार्ट्यांचे आयोजन केले जाते. अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील विविध ठिकाणी हॉटेल्स, लॉन तसेच फार्म हाउस अशा ठिकाणी पार्ट्यांचे नियोजन केले जाते. अशा पार्ट्यांत मोठ्या प्रमाणात दारूचा वापर केला जातो. परंतू ती दारू बनावट दारू असण्याची शक्यता नाकारता येत नाही. बनावट दारूची विक्री होणार नाही. याकडे लक्ष देण्याची जबाबदारी राज्य उत्पादन शुल्क विभागाची असते. येथील अधीक्षक सोनोने यांच्या म ार्गदर्शनाखाली कारवाईसाठी ८ पथके नियुक्त केली गेली आहे. त्यांच्याकडून थर्टी फर्स्ट व नाताळ सणाच्या अनुषंगाने कारवाई सुरू करण्यात आली आहे. नाताळ व थर्टी फर्स्टच्या दिवशी मद्य पार्टीचे आयोजन केलेल्या ठिकाणी एक दिवसीय परवान्याशिवाय मद्य वितरण चालू असल्यास तेथे कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व मद्य निमिर्ती, किरकोळ व ठोक मद्य विक्रेत्यांच्या दुकानात सीसीटीव्ही कॅमेर्याची नजर असणार आहे. नाताळ व थर्टी फर्स्टच्या अनुषंगाने अधीक्षक सोनोने यांच्या कार्यालयात सात दिवस २४ तास स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तसेच कार्यक्षेत्रीय व प्रभारी अधिकारी यांच्या मार्फत नियंत्रण ठेवण्यात येत आहे. सर्व प्रकारच्या मद्य विक्री अनुज्ञप्तीचे निरीक्षण करण्याय येत असल्याचे उत्पादन शुल्क विभागाकडून सांगण्यात आले.

परवाना घेऊनच करा पार्टी नाताळ व थर्टी फर्स्टच्या दिवशी रिसॉर्ट, हॉटेल आदी ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या पार्ट्यांना एक दिवसीय परवाना घेणे बंधनकारक आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून हा परवाना दिला जातो. त्यांच्या संकेतस्थळावरून हा परवाना प्राप्त करून घेता येतो. दरम्यान, परवाना न घेता पार्टीचे आयोजन केल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिला आहे.

# सुशासन सप्ताह अंतर्गत रोजगार हमी जलसंधारणाच्या कामाचा आढावा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नांदेड :** १९ ते २५ डिसेंबर सुशासन सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या सुशासन सप्ताहमध्ये दिर्घकालीन व शाश्वत विकासाच्या अनेक उपक्रमांना स्थानिक प्रशासनाने गती देण्यास प्राधान्य दिले आहे. दिनांक २३ डिसेंबर रोजी या सुशासन सप्ताह अंतर्गत जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी जिल्ह्यातील यंत्रणेचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन भवनामध्ये आज या संदर्भात बैठक आयोजित करण्यात



आली होती. प्रामुख्याने यावेळी रोजगार हमी व जलसंधारणाच्या संदर्भातील आढावा घेतला.

यात जलयुक्त शिवार, नरेगा, पांदण रस्ते, विहिर बांधकाम, गाळमुक्त तलाव, शेततळे, शोषखड्डे, घरकुल, चारा लागवड, बांबुलागवड तसेच जलसंधारणांतर्गत शेततळे, तुषारसिंचन, सुक्ष्मसिंचन, मृदजलसंधारण आदी संदर्भात आढावा घेण्यात आला. पावसाळा लागण्यापूर्वी यासंदर्भातील कामांचे नियोजन आवश्यक आहे. तसेच या आर्थीक वर्षातील पुढील तीन महिने बाकी असून यामध्ये खर्चाचे नियोजन आवश्यक आहे. त्यामुळे तातडीने संपूर्ण यंत्रणेने याबाबत काम करावे, असे आवाहनही करण्यात आले. बैठकीला उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, उपजिल्हाधिकारी रोहयो ललीतकुमार वऱ्हाडे यांच्या विभाग प्रमुख उपस्थित होते.

# प्रदुषण वाढीमुळे मानवी आरोग्य व शेती पिकांना धोका वाढला

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.२३, झरी (यवतमाळ) :** मुकूटबन वणी बोरी राज्य मार्गा जवळील आजूबाजूला असलेल्या कोळसा खानी, चुना भट्टे, गिट्टी क्रेशर स्टोन संबंधित डोलोमाईट माईन्स कंपन्यांमुळे व रेडीमिक्स आधुनिक सिमेंट कंपन्यांमुळे दिवसेंदिवस प्रदूषणात भरमसाठ वाढ होत आहे. मात्र येथील औद्योगिक कंपनी अधिकाऱ्याकडून प्रदुषण बाबत नियम काटेकोरपणे पाळले जात नसल्याने प्रदूषण वाढीस लागले आहे. येथील प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने कसलीच कठोर कारवाई होत नसल्याने प्रदूषण नियंत्रण मंडळावर शंका उपस्थित होत आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दुर्लक्षितपणाचा फटका येथील शेतकऱ्यांना सतत सहन करावा लागत आहे. येथे औद्योगिक कंपन्यांमधूननिघणाऱ्याधुराचे दुषित परिणाम वाढते आहे.

मोठ्या उद्योगांमुळे होणाऱ्या प्रदूषणाबरोबरच कारखान्यांच्या खाली आणि आजूबाजूच्या जमिनीवरही होणारे परिणाम स्पष्ट होत आहेत. औद्योगिक प्रदूषण हे वन्यजीव नामशेष होण्यासाठी आणि शेवटी भविष्यात ग्लोबल वार्मिंगचा धोका निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. नैसर्गिक वातावरण, अगदी औद्योगिक नसलेल्या क्षेत्रांवरही परिणाम होत आहे.येथील प्रदूषणामूळे मानवी आरोग्यावर परिणाम होत आहे. अनेक व्यक्तींना दमा,खासीव त्वचेच्या रोगांमध्ये वाढ झाली आहे. अनेकांना धुळीकरणामुळे श्वास घेण्यास कठीणाई होत आहे.धुळीकरणामुळे. शेतकर्यांच्यापिकांवर परिणाम होऊन येथील शेतकऱ्याचे उत्पन्न घटले आहे. या ठिकाणांच्या वातावरणातील हवेची गुणवत्ता घसरली आहे. तालुक्यातील सिमेंट कंपनी व येथील अनेक डोलोमाईट माईन्स कंपन्यांमुळे त्यांच्या जड वाहतूकीच्या वर्दळीत वाढ झाली आहे. वाहतूक सुरू असतानाही धुळ पसरत आहे. येथील मोठ्या औद्योगिक कंपनी अधिकार्यांच्या हलगर्जीपणामुळे प्रदुषण वाढले आहे. येथील वातावरणातील हवेत धुळीचे कण पसरून वातावरण देखील दुषित होत आहे. या ठिकाणी वातावरणात धुळीच्या कणांचे थर हवेत पसरत आहे.मुकूटबन, अडेगाव क्षेत्रातून डोलोमाईट कंपन्यांच्या अवाजवी ओव्हरलोड ट्रक वाहतूकीमुळे व ताडपत्री नझाकल्यानेबारीक चुरी,क्लिंकरव सिमेंटचे बारीक कण पडून हवेत पसरत आहे. ओव्हरलोड वाहतूक होत असतांना येथील पोलिस प्रशासनाचे देखील दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

औद्योगिक कंपन्यांमधील धुळीकरणाचा व नेहमी होणाऱ्या मनमानी ओव्हरलोड वाहतूकीमुळे उडणाऱ्या धुळीचा विपरीत परिणाम या ठिकाणच्या मानवी आरोग्यावर तसेच शेती पिकांवर होत आहे. या प्रकाराला मुख्य कारण तालुक्यातील औद्योगिक कंपन्या काटेकोरपणे नियमाचे पालन करीत नसल्याने प्रदुषणाचा फटका येथील नागरिकांना सतत सहन करावा लागत आहे. येथील प्रदुषणावर प्रतिबंधात्मक उपाययोजना न केल्यास येत्या भविष्यात वाढत्याप्रदूषणाचेवाईट परिणाम सर्वांनाच भोगावे लागतील यात तिळमात्र शंका नाही.

# हेमाडपंथी प्रति पंढरपूर असलेले श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या जीर्णोद्धाराला सुरुवात

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.२३, रेणापूर (लातूर) :** रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील हेमाडपंथी प्रति पंढरपूर असलेले श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या जीर्णोद्धाराला सुरुवात झाली. दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी ऐतिहासिक असा हा कार्यक्रम पार पडला. सकाळी ६ वाजता विठ्ठल रुक्मिणीची नित्य महापूजा पार पडली. नंतर सकाळी ९ वाजता वेद शास्त्र संपन्न अनिरुद्ध देव इनामदार चिंचोलीकर यांच्या व त्यांच्या सहकार्याच्या मंत्र उच्चारात विधियुक्त शास्त्र शुद्ध पद्धतीने ही महापूजा पार पडली.




प्रदीप कुलकर्णी, सुरेंद्र हरिदास, रणजित कस्तुरे, उतरेश्वर अप्पा हलकुडे, बब्रुवान संपते यांच्या सह आदी च्या हस्ते महापूजा व यज्ञ पार पडला. पुरातन विभागाचे सहायक संचालक अमोल गोटे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. संध्याकाळी ५ वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी ची महापूजा करून दही, दुधाने देवाचे दैवत्व काढण्यात आले व विधियुक पद्धतीने श्री विठ्ठल रुक्मिणीच्या मूर्ती मूळ ठिकाणा वरून शास्त्र शुद्ध पद्धतीने काढण्यात आल्या व वाजता गाजत या मुर्ती दुसऱ्या ठिकाणी श्री विठ्ठल रुक्मिणी ची प्रतिष्ठापाना करण्यात आली. नेत्रदीपक असा हा कार्यक्रम पार पडला. देव आपल्या देव घरातून दुसऱ्या ठिकाणी राहण्यासाठी जात असलेला पाहून काही भाविक भक्त भावुक झाल्याचे पहावयास मिळाले. राज्य सरकार ने ९ कोटी ३४ लाख ४९ हजार रुपयांचा निधी शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य मंत्रालयातूनमंजूर केला. तसेच भारतातील ७३मंदिराच्या यादीत पानगाव येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा समावेश करण्यात आला. त्यात या मंदिराचा ६४ वा क्रमांक मिळाला आहे.

विठ्ठल रुक्मिणी मंदिराला राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्यात येणार आहे. उत्तर चालुक्यकालीन १२- १३ व्या शतकातील पानगावचे हे मंदिर आहे. पानगाव येथील प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या पानगाव येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर हे पानगाव व पानगाव परिसरातील लोकांचे श्रद्धास्थान आहे. या ठिकाणी महिन्याच्या एकादशी ला या मंदिरात विविध कीर्तिन करांचे कीर्तन ठवले जाते तसेच फराळाची व्यवस्था केली जाते. दरवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीला या ठिकाणी आजूबाजूच्या गावच्या दिंड्या येत असतात पंढरपूर सारखे वातावरण या ठिकाणी होत असते. या मंदिराच्या जीर्णोद्धाराला कामाला प्रत्यक्ष सुरवात झाल्या मुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. पुंडलिक वर्धा विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम पंढरीनाथ भगवान की जय च्या घोषणेने परिसर गजबजून गेला होता. ज्ञानोबा तुकारामच्या जय घोषात श्री विठ्ठल रुक्मिणीच्या मुर्ती नवीन ठिकाणी घेऊन जाण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी पानगाव व पानगाव परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंदिर समितीच्या सुरक्षा रक्षकाचा प्रामाणिकपणा; महिला भाविकाचे दागिने शोधून केले परत

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२३, पंढरपूर :** सुजित शेळवणे, मंडळाधिकारी टेंभुर्णी (ता.माढा) हे आपल्या कुटुंबासह रविवार, दि.२२ डिसेंबर २०२४ रोजी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आले होते. दर्शन झाल्यानंतर संबंधित महिला भाविकाच्या गळ्यातील मंगळसूत्र गहाळ झाल्याचे लक्षात आले. त्यांनी मंदिर समितीच्या कार्यालयाशी संपर्क साधला असता दर्शन रांगेतील रक्षक ग्रुपचे सुरक्षा रक्षक आदित्य बाबर, यास सदर दागिने आढळून आले. त्यांनी तात्काळ नियंत्रण कक्षात दागिने जमा केले त्यानंतर खात्री



करून संबंधित भाविकास ते परत करण्यात आले. संबंधित दापत्यांना छत्रपती शिवाजी चौक येथे गेल्यानंतर सदरबाब त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना संपर्क केला. व्यवस्थापक श्री श्रोत्री यांनी तात्काळ मंदिर समितीच्या नियंत्रण कक्षात संपर्क करून सूचना दिल्या. तद्नंतर सीसीटीव्ही ऑपरेटर यांनी कॅमेरातील रेकॉर्डींग पाहणी करून व सर्व सुरक्षा रक्षकांना वॉकीटॉकी द्वारा सूचना केल्या असता, दर्शनरांगेतील सुरक्षा रक्षक आदित्य तुकाराम बाबर, रक्षक ग्रुप यास सदरचे दागिने आढळून आल्यानंतर त्यांनी नियंत्रण कक्षात जमा केले व खात्री करून संबंधित भाविकास परत करण्यात आले.

सदरचे दागिने मिळाल्यानंतर प्रामाणिकपणे मंदिर समितीच्या कार्यालयात जमा केल्याबद्दल सुरक्षा रक्षकाचा मंदिर समिती मार्फत सन्मान केला व मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी देखील दुरध्वनीद्वारे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. सुजित शेळवणे यांचे कुटुंब श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे निस्सिम भक्त आहेत. सद्यस्थितीत, नाताळ / ख्रिसमस उत्सव सुरू असल्याने भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी आहे. शेळवणे यांना मंगलसुत्र परत मिळाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्टपणे दिसत होता. अवघ्या काही तासांनी आपल हरवलेल सौभाग्याचं लेणं मिळाल्याने त्यांनी मंदिर समितीच्या कर्मचा-या प्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# दिव्यातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी मनसेचे प्रकाश पाटील करणार आमरण उपोषण

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२३, दिवा (ठाणे) :** दिव्यातील पाणी समस्या सोडविण्यासाठी ठाणे महापालिका प्रशासन अपयशी ठरले असूनप्रशासनाच्या दुर्लक्षाच्या निषेध करण्यासाठी व दिव्यातील पाणी प्रश्न सुटावा या मागणीसाठी मनसेचे विभाग प्रमुख प्रकाश पाटील हे दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी पासून आमरण उपोषणाला बसणार आहेत. दिवा रेल्वे स्टेशन येथे मनसेचे विभाग प्रमुख प्रकाश पाटील हे आमरण उपोषणाला बसणार असून त्यांच्यासोबत मनसेचे पदाधिकारी साखळी उपोषण करण्याची माहिती आहे.

**दिवेकरांनो.. तुम्हाला खरचं राग येत नाहीये का ?**

१) दिव्यात तुमची स्वतःची रूम आहे;पण त्या रूम मध्ये मात्र नळाला पाणी आहे का ?
२) पाण्याची लाईन आहे, पण तिला पाणी नाही, म्हणून महिन्याला ५०० रुपये देऊन विकत घ्यावं लागतंय ना?
३) ज्या एरियात राहता तिथे पालिकेच्या नळाला पाणी येत नाही, पण पाणी विकणाऱ्यांच्या नळाला पाणी येतंय ना?
४) पाणी माफियांकडून चार हंडे पाणी विकत घेऊनही त्यांची दादागिरी ऐकून घ्यावी लागतेय ना ?
५) जरी नळाला आठवड्यातून २ तास पाणी येत असलं; तरी वर्षाला पाण्याचं बिल मात्र पूर्ण येतयं ते भरताय ना?

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पुन्हा एकदा पाणी प्रश्नाला वाचा फोडल्याने ठाणे महानगरपालिका आणि सत्याधारांना यामुळे अडचणी आता वाढणार आहेत. दिवा शहरात सातत्याने नागरिकांना पाणी प्रश्न भेडसावत असल्याने यावर कायमस्वरूपी उपाययोजना करमहानगरपालिका प्रशासनाला आणि सत्याधारांना अपयश आले आहे. पाणी प्रश्नावर दिवा शहरातील नागरिकांनी आणि राजकीय पक्षानी वेळोवेळी आंदोलन केली आहेत. आणि ठाणे महानगरपालिकाला निवेदन सुद्धा दिले आहेत. मात्र ठाणे महानगरपालिका प्रशासन यावर ठोस उपाययोजना करत नसल्याने आजही दिव्यातील नागरिकांना अनेक भागांत पाणी समस्येला सामोरे जावे लागत आहे. हाच मुद्दा लक्षात घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे विभाग प्रमुख प्रकाश पाटील यांनी २४ डिसेंबर २०२४ रोजी पासून आमरण उपोषण करणार असण्याची घोषणा केली आहे. अहो, आज दिव्यात काही ठिकाणी १ दिवस आड तर काही ठिकाणी २ दिवस आड फक्त दोन ते अडीच तास पाणी येतं. पाणी सोडल्यानंतर अर्धा तास लोकांचा फक्त एअर काढण्यात जातो. त्यानंतर जे दोन तास पाणी येतं त्यालाही म्हणावा तसा प्रेशर नसतो. अहो आपण महिन्याचे ५०० रुपये मेंटेनन्स देऊन वर्षाचं पाण्याचं बिल भरायचं आणि परत दर महिन्याला पाणी माफियाला चार हंडे पाण्यासाठी ५०० रुपये द्यायचे हेच आपलं जगणं झालं नाहीये का ?पाणी विकणारे हे टँकर वाले याना पाणी मिळतं पण आपण पाण्याचं बिल भरूनही पाणी मिळत नाही. इथल्या काही पुढार्यांनी तर पाणी माफिया पाळून ठेवले आहेत. ज्या विभागात पाणी येत नाही तिथे हे पाणी विकणारे माफिया लोकांकडून चार-पाच हंड्यांसाठी महिन्याला ४०० ते ५०० रुपये घेतात. जर एखाद्या नागरिकाने पाण्यासाठी तक्रारी केल्या तर त्यांचे पाणी बंद केलं जातं. कोणीही त्यांच्या विरोधात बोललं कि त्याच पाणी बंद करा हि पद्धत आज दिव्यात वापरली जात आहे. या सगळ्याची माहिती महानगरपालिकेच्या लोकांना आहे पण चिरीमिरीने सगळ्यांची तोंडं बंद करून ठेवली आहेत.

संपूर्ण दिवा शहराच्या याच पाणी प्रश्नावर आता मनसेनी शड्डू ठोकलाय आणि यात मनसेला दिव्यातील जनतेची साथ हवी आहे. येत्या मंगळवारी, दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी अन्यायाच्या विरोधातील प्रतीक असलेल्या शिवरायांच्या आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला वंदन करून मनसेचे विभाग प्रमुख आणि पदाधिकारी दिवा रेल्वे स्टेशन, मुंब्रादेवी कॉलनी रिक्षा स्टॅन्ड जवळ आमरण उपोषण सुरु करणार आहोत. या उपोषणाला दिव्यातील नागरिकांनी उपस्थित राहून आपला राग व्यक्त करावा असे आव्हान आणि विनंती मनसेकडून करण्यात आली आहे.

## थोडक्यात

# नूतन विद्यालय सांस्कृतिक कार्यक्रमातून केला जागर लोककलेचा

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**




**दि.२३, कल्याण (ठाणे) :** सांस्कृतिक स्नेहसंमेलन छत्रपती शिक्षण मंडळ संचालित नूतन संकुल कल्याण कर्णिक रोड येथे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण जागर लोककलेच्या कार्यक्रमातून शालेय विद्यार्थ्यांनी सादर केला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे महेश अग्रवाल रेजन्सी ग्रुप उद्योजक आणि महेश अग्रवाल उद्योजक हे उपस्थित होते. यावेळी शालेय जीवनात विविध कलागुणांना संधी भेटते त्यातूनच भावी कलाकार घडतात. म्हणून शालेय विविध कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलाच पाहिजे अशा भावना व्यक्त करून कार्यक्रमाला महेश अग्रवाल यांनी शुभेच्छा दिल्या. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकही सहभागी झाले होते. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कलाशिक्षक श्रीहरी पवळे आणि विद्यार्थ्यांनी धमाल उडवून दिली. हरवलेली नाथ छकुली शोधण्यासाठी विविध लोककलेचा प्रवास दाखविला. नूतन संकुल कल्याण पूर्व प्राथमिक प्राथमिक आणि माध्यमिक विभागाचे सर्व विद्यार्थी पालक आणि माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रेश्मा सय्यद प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका भारती वेदपाठक. पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका दिपाली साबळे सांस्कृतिक प्रमुख श्रीहरी पवळे संजय मंजुळे आणि सर्व शिक्षकांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली. पाहुण्यांचे स्वागत सूत्रसंचालन मिताली बोकील यांनी केले. अशा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमाचे पालकांनी खूप कौतुक केले.

# जि.प.शाळा, सुळयाचापाडा शाळेचे विविध स्पर्धेत घवघवीत यश

**अक्षराज : प्रमोद मौळे**



**दि.२३, जव्हार (पालघर) :** बिट स्तरीय क्रिडा स्पर्धत पवार पाडा बिटात केळघर केंद्रातील जि.प. शाळा, सुळयाचापाडा शाळेने लंगडी या क्रिडा प्रकारात मुलींनी प्रथम क्रमांक मिळविला आहे. या खेळात त्यांनी उत्तम खेळाची चुणूक दाखवत हे यश संपादन केले आहे. तसेच पवारपाडा बिटात झालेल्या विविध गुणदर्शन मध्ये वकृत्व स्पर्धेत सुळ्याचा पाडा शाळेतील कु. प्रणाली प्रकाश लोखंडे या मुलीने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तसेच नाटय स्पर्धत शाळेने भारतीय सुजाण नागरिक या विषयावर उत्तम नाटीका सादर करून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. शाळेने मिळवलेल्या या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या यशाचे पवारपाडा बीटाचे शिक्षण विस्तार अधिकारी किरण शिंदेयांनीही कौतुक केले. शाळेचे शिक्षक रोहित कोळी व सचिन तुरे यांनी केळघर केंद्राचे केंद्रप्रमुख नरेश भोये यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांची उत्तम तयारी करून घेतली. या यशामध्ये शाळेचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गंगाराम तराळ, सर्व सदस्य, गावातील शिक्षण प्रेमी काशिराम मोरघा, गावातील ग्रामस्थ, केळघर केंद्रातील सर्व शिक्षक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# घरबसल्या करता येणार पुजेची नोंदणी

## ऑनलाईन नोंदणी - कार्यकारी अधिकारी शेळके

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२३, पंढरपूर :** श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यपुजा, पाद्यपूजा, तुळशी पूजा, चंदन उटी पूजा इत्यादी पूजा श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. दि. ०१ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीतील पुजांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात दि.२६ डिसेंबर रोजी स.११ वाजल्यापासून होत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. याबाबत मंदिर समितीच्या दि. २० ऑगस्ट रोजीच्या सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. भाविकांना पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेत स्थळावरून करता येणार आहे. यापूर्वी पहिल्या टप्प्यात दि.०७ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीतील श्रींच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली होती. यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.आता, दुस-या टप्प्यात दि. ०१ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल. याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६ -२९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा असे आवाहन व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी केले आहे.

# मुंबईच्या कमाल तापमानात घट

**दि.२३, मुंबई :** मुंबईत गेल्या आठवड्यात कमाल तापमान चढे होते. मागील दोन दिवसांपसून राज्यातील थंडीतही चढ – उतार होत आहे. काही भागात अंशतः ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता हवामान विभगाने वर्तवली आहे. दरम्यान, मुंबईत सोमवारी कमाल तापमानात घट झाली असून संपूर्ण नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यातील २० दिवस कमाल तापमान चढे असताना सोमवारी मात्र कमाल तापमान ३० अंशाच्या आत नोंदले गेले.

हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात सोमवारी २९ अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ केंद्रात २८.७ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. दोन्ही केंद्रांवरील तापामान सरासरीपेक्षा कमी नोंदले गेले. मागील अनेक दिवस मुंबईतील कमाल तापमान ३२ ते ३५ अंश सेल्सिअसदरम्यान नोंदले जात होते. त्यानंतर सोमवारी पहिल्यांदा हंगामातील कमी कमाल तापमान नोंदले गेले. याआधी ४ डिसेंबर रोजी कुलाबा केंद्रात ३७.३ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली होती.